## ४ (१) (ख) (VII)

## आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील

.................................................................................

या माहितीत यापूर्वी ४ (१) (ख) (तीन) मध्ये निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यांत येणारी कार्यपध्दती विषद करण्यांत आली आहे. हीच कार्यपध्दती धोरण तयार करणे किंवा त्याची अंमलबजावणी करणे तसेच लोकांशी विचार विनिमय करणे आणि निवेदने केली जाणे याकरिता अवलंबिण्यांत येते. एखादे नवीन धोरण निश्चित करायचे असल्यास ते ज्या विषयाशी संबंधीत आहे तो विषय हाताळणा-या कार्यासनाकडून त्याची प्रारंभीक टिप्पणी सादर केली जाते. त्या टिपणीवर वरिल प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे प्रशासकीय शृंखलेतील अधिका-यांचे अभिप्राय नमूद होऊन अंतत: निर्णय होतो. एखाद्या वेगळया व पुर्णत: नविन बाबीकरिता अगर धोरण ठरविण्यासाठी आवश्यकतेनुसार त्या-त्या विषयातील तज्ज्ञांची समिती नियुक्त केली जाते. अशी समिती त्या बाबी विषयी आपले अभिप्राय देते. असे अभिप्राय त्या-त्या धोरणात्मक बाबीसाठी विचारात घेतले जातात. कोणत्याही समितीच्या काही किंवा सर्व शिफारशी किंवा अहवाल प्रत्येक वेळी स्विकारले जातीलच असे नसते. संचालनालय आपल्या अधिकारात योग्य त्या छाननीअंती असे अहवाल किंवा शिफारशी कोणत्या मर्यादेपर्यंत स्विकारायच्या किंवा नाकारायच्या याविषयी निर्णय घेते. एखाद्या विषयाशी संबंधीत आपले म्हणणे किंवा सूचना मांडण्यासाठी संबंधीत व्यक्ति , नागरीक किंवा एखाद्या विषयातील तज्ञ पुर्वनियोजित वेळ घेऊन किंवा दैनंदिन कामकाजाच्या दिवशी अभ्यागतांच्या भेटीच्या वेळेत संचालनालयातील संबंधीत अधिका-यांना भेटु शकतात आणि निवेदन सादर करु शकतात.